# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-14.08.2026** **वार- शुक्रवार**

---

**सुनेत्रा-पवार**

पुणे जिल्ह्यातील चाकण एमआयडीसी मधील रस्ते, वाहतूक कोंडी आणि इतर पायाभूत सुविधासंबंधी अडचणी प्राधान्यानं सोडविण्यात येतील, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिली आहे. यासाठी चाकण मधील उद्योजक, एमआयडीसीचे वरिष्ठ अधिकारी तसंच स्थानिक आणि जिल्हा प्रशासना सोबत लवकरच बैठक घेण्यात येईल, असं त्यांनी सांगितलं आहे.
सुनेत्रा पवार यांनी चाकण नागरी कृती समिती आणि औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी धनंजय शेडबाळे यांच्याशी दूरध्वनीवरून सविस्तर चर्चा केली. यावेळी उद्योजकांच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्या सोडविण्या बाबत त्यांना आश्वस्त केले. या प्रश्नावर तातडीनं उपाययोजना करण्याच्या सूचना पवार यांनी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

**प्रताप सरनाईक**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रवाशांना सुरक्षित, स्वच्छ आणि दर्जेदार सुविधा मिळाव्यात, यासाठी परिवहन मंत्री तसंच एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी आज पुणे बसस्थानकाला भेट दिली.
यावेळी सरनाईक यांनी बसस्थानकातील हिरकणी कक्ष, पाणपोई, प्रसाधनगृह तसंच प्रवाशांसाठी उपलब्ध असलेल्या अन्य मूलभूत सुविधांची पाहणी केली.
बसस्थानकाची, प्रसाधनगृहांची स्वच्छता आणि देखभाल, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता तसंच महिला प्रवाशांसाठी आवश्यक सुविधा यामध्ये कोणतीही कमतरता राहू नये, याबाबत त्यांनी अधिकाऱ्यांना सूचना केल्या.
“एसटी बस ही सर्वसामान्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे.  प्रवाशांना चांगली बससेवा देणं, ही महामंडळाची जबाबदारी आहे. या बाबतीत कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही,” असा इशाराही सरनाईक यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिला.

**मंजुषा-नागपुरे**

पुण्यातील रस्त्यांची दुरवस्था लक्षात घेऊन महापौर मंजुषा नागपुरे यांनी पथ विभागाची बैठक घेतली. दोन वर्षांतील रस्त्यांची कामं, दोषदायित्व कालावधी, पुनर-डांबरीकरण आणि दुरुस्तीवरील खर्चाचा अहवाल आठ दिवसांत सादर करण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत. कामांची पुनरावृत्ती आढळल्यास संबंधित ठेकेदार आणि अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे. तसंच शहरातील सर्व खड्डे आठ दिवसांत बुजवण्याचे निर्देश महापौरांनी यावेळी दिले.

**मसाप संमेलन**

पुण्यात जानेवारी २०२७ मध्ये होत असलेलया शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेनलानाच्या निमित्तानं राज्यासह देश-विदेशात ९९ नांदी संमेलनं घेण्यात येणार आहेत. त्यापैकी पहिलं नांदी संमेलन आज महाराष्ट्र साहित्य परिषद, समर्थ युवा फाऊंडेशन आणि महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक सभेतर्फे टिळक रस्त्यावरील हिराबाग इथं आयोजित करण्यात आलं होतं. यावेळी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण, संमेलनाचे अध्यक्ष पानिपतकार विश्र्वास पाटील, शंभराव्या संमेलनाचे संयोजक राजेश पांडे, तसंच मसापच्या प्रमुख कार्यवाह डॉ. स्वाती महाळंक, विधान परिषदेच्या माजी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे आदी मान्यवर उपस्थित होते.

**जल संधारण**

पुणे जिल्ह्यातील गावांमध्ये ग्रामपंचायतींच्या सहभागातून जलसंधारणाला बळ देण्यासाठी पुणे जिल्हा परिषदेनं पुढाकार घेतला आहे. यासाठी जिल्हा परिषदेच्या स्वनिधीतून जलसंधारणाच्या विविध ३०८ कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली असून यासाठी २ कोटी २६ लाख ८० हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

या निर्णयामुळे ग्रामपंचायतींच्या सहभागातून जलसंधारणाला बळ मिळणार आहे. दरवर्षी पावसाचं पाणी जास्तीत जास्त प्रमाणात अडवून त्याचा उपयोग व्हावा असं जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांनी यावेळी सांगितलं.

**विद्यार्थी वाहतूक**

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी शाळा प्रशासन आणि स्कूल बस चालकांनी नियमांचं काटेकोर पालन करावं, असे निर्देश पुणे शहराचे पोलीस सहआयुक्त संजय दराडे यांनी दिले आहेत. पुणे पोलीस आयुक्तालयात झालेल्या जिल्हा स्कूल बस सुरक्षितता समितीच्या बैठकीत ते बोलत होते.

विद्यार्थ्यांची वाहतूक करणार्या वाहनांमध्ये चालू स्थितीतील सीसीटीव्ही लावणं,

चालक, मदतनीस आणि महिला सहवर्ती यांची पोलीस चारित्र्य पडताळणी, तसंच वैद्यकीय तपासणी अनिवार्य करण्यात आली आहे. पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक फेरीत महिला सहवर्ती असणं आवश्यक आहे.

सर्व शाळा आणि वाहतूकदारांनी तीन महिन्यांत नियमांची पूर्तता करणं बंधनकारक करण्यात आलं आहे.

**पीकविमा**

पंतप्रधान पीकविमा योजनेअंतर्गत २०२६ च्या खरीप हंगामात पुणे जिल्ह्यात सुमारे ८३ हजार शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला आहे. शेतकऱ्यांनी विमा हप्त्यापोटी सुमारे ५९ लाख ७० हजार रुपयांची रक्कम भरली आहे. या माध्यमातून जिल्ह्यातील सुमारे ३९ हजार हेक्टर खरीप क्षेत्राला पीकविमा संरक्षण मिळणार असल्याची माहिती जिल्हा कृषी अधीक्षक संजय काचोळे यांनी दिली आहे.

**प्रस्ताव**

पुणे जिल्ह्यातील अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांच्या विकासासाठीच्या कामांबाबतचे नवीन प्रस्ताव ग्रामपंचायतींकडून मागवण्यात आले आहेत. ही सूचना जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण समितीचे सभापती जितेंद्र बडेकर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांना पत्राद्वारे केली आहे.

**मॅरेथॉन**

पुण्यातील गांधी लॉन्स, कोथरूड-कर्वेनगर इथं उद्या, स्वातंत्र्यदिना निमित्त सलग चौथ्या 'ऐटेनेक्स् इंडिपेंडन्स् डे रन' मॅरेथॉनचं आयोजन करण्यात आलं आहे. पहाटे चार वाजता सुरू होणाऱ्या या स्पर्धेत तीन हजाराहून अधिक धावपटू सहभागी होण्याची अपेक्षा आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज आकाश अंशत: ढगाळ होतं. तसंच काही ठिकाणी हलक्या स्वरूपाचा पाऊस पडला. उद्या देखील आकाश ढगाळ राहून हलका पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**